आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in गुरुवार दिनांक 25/06/2026 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन | पिंपरी चिंचवड व पुणे | पान 4 | अंक 140 | RNI - MAHMAR /2021/51259 | metrocity924@gmail.com

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या पुढाकारातून राबविलेल्या उपक्रमामुळे कैद्यांचे यशस्वी पुनर्वसन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : गुन्हेगारीचा रस्ता सोडून कैद्यांनी पुन्हा एकदा समाजाच्या प्रवाहात यावे. भूतकाळ विसरून सन्मानाने जीवन जगावे आणि त्यांच्या कुटुंबालाही स्थैर्य मिळावे, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने राज्यातील विविध कारागृहांमध्ये कैद्यांच्या पुनर्वसनासाठी विशेष उपक्रम राबविला जात आहे.**



यासाठी 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स' संस्थेशी सामंजस्य करार करण्यात आला आहे. या उपक्रमातून कैद्यांना गुन्हेगारी जग सोडून सकारात्मक आयुष्याची कास धरण्यासाठी मोठे मानसिक आणि सामाजिक बळ मिळत आहे. त्यांचे यशस्वी पुनर्वसन करण्यात येत आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संवेदनशील विषयाकडे केवळ कायदा, सुव्यवस्था किंवा शिक्षेच्या दृष्टिकोनातून न पाहता, व्यापक सामाजिक सुधारणा म्हणून पाहिले आहे. त्यांच्या दूरगामी विचार सरणीमुळे आणि सततच्या पाठ पुराव्यामुळेच हा उपक्रम सध्या राज्यातील मुंबई, ठाणे, तळोजा, येरवडा (पुणे), नागपूर आणि नाशिक या प्रमुख मध्यवर्ती कारागृहामध्ये प्रभावीपणे सुरु आहे. यासोबतच भायखळा, कल्याण, लातूर आणि अलिबाग या जिल्हा कारागृहांमध्येही या उपक्रमांतर्गत कैद्यांच्या आयुष्याला नवी दिशा देण्याचे काम कारागृह प्रशासनाच्या सहाय्याने युद्धपातळीवर सुरु आहे. या उपक्रमाचे सकारात्मक आणि दूरगामी परिणाम आता दिसू लागले असून, कारागृहातील बंदीवान आपल्या नकारात्मक मानसिकतेतून बाहेर पडत आहेत.

उपक्रमाची आखणी करताना कैद्यांच्या मानसिक, शारीरिक आणि आर्थिक अशा तिन्ही बाजूंवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. अनेकदा कायद्याच्या योग्य माहितीअभावी किंवा प्रदीर्घ न्यायालयीन प्रक्रियेमुळे कैदी नैराश्यात जातात. हीच बाब लक्षात घेऊन कारागृहांद्वारे कायदेविषयक विशेष शिबिरे आयोजित केली जात आहेत. तज्ज्ञ वकिलांमार्फत कैद्यांना त्यांच्या हक्कांची आणि कायदेशीर प्रक्रियेची सोप्या भाषेत माहिती दिली जात आहे. कैद्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याची काळजी घेण्यासाठी नियमित वैद्यकीय आणि मानसोपचार शिबिरे आयोजित केली जात आहेत.

कैदी जेव्हा आपली शिक्षा पूर्ण करून कारागृहातून बाहेर पडेल, तेव्हा तो आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावा आणि त्याने पुन्हा गुन्हेगारीकडे वळू नये, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. यासाठी विविध कौशल्य विकास वृद्धिंगत करणारी व्यावसायिक आणि तांत्रिक प्रशिक्षण शिबिरे चालवली जात आहेत.या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे कैद्यांचा त्यांच्या कुटुंबीयांशी तुटलेला संपर्क पुन्हा जोडून देणे हे आहे. कारागृहातील बंदिवानांचा त्यांच्या कुटुंबीयांशी नियमित आणि आदरयुक्त संवाद साधून दिला जातो. यातील सर्वात संवेदनशील पाऊल म्हणजे, कैद्यांना त्यांच्या लहान मुलांसोबत प्रत्यक्षरित्या, कोणत्याही अडथळ्याविना समोरासमोर बसवून संवाद साधण्याची आणि त्यांना जवळ घेण्याची संधी दिली जात आहे. यामुळे कैद्यांमधील गुन्हेगारीची भावना नष्ट होऊन त्यांच्यात जबाबदार पालक आणि कौटुंबिक व्यक्ती म्हणून जगण्याची तीव्र इच्छा निर्माण होण्याचा विश्वास आहे.

हा उपक्रम केवळ कैदी कारागृहात असेपर्यंतच मर्यादित नाही, तर तो जेव्हा शिक्षा पूर्ण करून बाहेर पडेल, तेव्हा समाजाने त्यांचा स्वीकार करावा यासाठीही व्यवस्था करण्यात आली आहे. कारागृहातून सुटल्यानंतर समाजात ताठ मानेने जगता यावे, यासाठी त्यांना शासनाच्या विविध कल्याणकारी आणि स्वयंरोजगार योजनांचा थेट लाभ मिळवून देण्याकरिता मदत करण्यात येत आहे. बँक कर्ज, ओळखपत्रे आणि इतर कागदपत्रे मिळवून देण्याकरिता मदत करण्यात येत आहे.एकंदरीत, गुन्हेगाराला केवळ शिक्षा न देता त्याचे माणूस म्हणून पुनर्वसन करणे आणि त्याला समाजाचा एक उपयुक्त घटक बनवणे, हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हा प्रयोग महाराष्ट्राच्या सामाजिक आणि गृह विभागाच्या इतिहासातील एक मैलाचा दगड ठरत आहे.

# एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी व्यापक धोरण राबविणार – मंत्री आदिती तटकरे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : राज्यातील अंदाजे 50 ते 55 लाख एकल महिलांच्या सन्मान, सुरक्षा आणि सक्षमीकरणासाठी स्वतंत्र व व्यापक धोरण राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, त्यांच्या हितसंवर्धनाला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल, असे प्रतिपादन महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले.**




महिला व बाल विकास विभाग, मुंबई शहर यांच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयात 'एकल महिला दिन' तसेच प्रस्तावित 'एकल महिला धोरण' यानिमित्त आयोजित जिल्हास्तरीय कार्यशाळेत त्या अध्यक्षस्थानावरुन बोलत होत्या.यावेळी मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते तसेच जिल्हाधिकारी आंचल गोयल यांच्या उपस्थितीत महिला व बाल विकास विभागाच्या विविध योजनांची माहिती देणाऱ्या क्यूआर कोडचे अनावरण करण्यात आले. कार्यक्रमात जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी शोभा शेलार यांनी एकल महिला धोरणाचे महत्त्व, कार्यशाळेची उद्दिष्टे आणि धोरण निर्मितीची प्रक्रिया याविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यशाळेत विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, विभागाच्या लाभार्थी महिला तसेच अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, महिला धोरण आणि एकल महिला धोरण हे काळानुरूप बदलणारे व लोकाभिमुख असेल. महिलांकडून प्राप्त होणाऱ्या सूचना, अभिप्राय आणि गरजांच्या आधारे त्यामध्ये आवश्यक बदल करण्यात येतील. एकल महिलांसाठी सुरक्षित निवारा, कौशल्य विकास व प्रशिक्षण केंद्रे, घर व जागेसंदर्भातील सवलती तसेच घरेलू हिंसाचाराशी संबंधित प्रकरणांचा जलद निपटारा यासाठी विविध शासकीय यंत्रणांनी समन्वयाने कार्य करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केलेल्या 'आंतरराष्ट्रीय विधवा दिना' ऐवजी महाराष्ट्र शासनाने 'एकल महिला दिन' साजरा करण्याचा निर्णय घेतला असून, राज्यातील एकल महिलांच्या समस्या, गरजा आणि हक्क यांवर केंद्रित स्वतंत्र धोरण तयार करण्यासाठी महिला व बाल विकास विभाग सक्रियपणे कार्यरत आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 25/06/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# सुरक्षा रखवालदार यांना सुरक्षा निरीक्षक पदावर पदोन्नती देण्याबाबत विधी समितीचा ठराव

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील जे सुरक्षा रखवालदार पदोन्नतीसाठी पात्र असतील त्यांना सुरक्षा सुपरवायझरऐवजी सुरक्षा निरीक्षक पदावर पदोन्नती देण्याबाबतचा महत्त्वपूर्ण ठराव महापालिकेच्या विधी समितीच्या विशेष बैठकीत करण्यात आला आहे. हा ठराव अंतिम मंजुरीसाठी महापालिका सभेसमोर ठेवण्यात येणार आहे.**



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विधी समितीची बैठक सभापती सुजाता बोराटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीला विधी समिती सदस्य तथा नगरसदस्य ज्ञानेश्वर जगताप, विनायक गायकवाड, कुंदा भिसे, श्रुती डोळस, कुशाग्र कदम, शेखर चिंचवडे, वर्षा जगताप, तुषार सहाणे यांच्यासह महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीमध्ये सुरक्षा रखवालदार यांच्या पदोन्नतीबाबत महत्त्वपूर्ण ठराव करण्यात आला. यापूर्वी जे सुरक्षा रखवालदार पदोन्नतीसाठी पात्र असतील, त्यांना सुरक्षा सुपरवायझर या पदावर पदोन्नती देण्यात येत होती. तसेच पात्र सुरक्षा सुपरवायझर यांना सुरक्षा निरीक्षक पदावर पदोन्नती दिली जात होती.

मात्र विधी समितीने आता सुरक्षा सुपरवायझर व सुरक्षा निरीक्षक या दोन्ही पदांचे समायोजन करून सुरक्षा निरीक्षक हे एकच पद ठेवून त्यावर पात्र सुरक्षा रखवालदार यांना पदोन्नती देण्याबाबत ठराव केला आहे. याशिवाय बैठकीत होर्डिंग्ज स्ट्रक्चरल ऑडिट, महापालिकेची महसूलवाढ, महापालिकेच्या ताब्यात असणाऱ्या उपलब्ध जागा आदींबाबत चर्चा करण्यात आली.

# कोचिंग क्लासमधील अग्निसुरक्षेकडे दुर्लक्ष ठरू शकते जीवघेणे! पिंपरी-चिंचवडची घटनाही धोक्याची घंटा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड प्रतिनिधी : युनूस खतीब**

**पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात स्पर्धा परीक्षा, व्यावसायिक अभ्यासक्रम आणि विविध प्रशिक्षणांसाठी कोचिंग क्लासेसची संख्या झपाट्याने वाढत असताना अनेक ठिकाणी अग्निसुरक्षा नियमांकडे होत असलेले दुर्लक्ष विद्यार्थ्यांच्या जीवावर बेतू शकते. देशातील सूरत, लखनौ आणि पिंपरी-चिंचवडमधील आगीच्या घटनांनी हा धोका पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे.**




गुजरातमधील सूरत येथील तक्षशिला आर्केड कोचिंग क्लासमध्ये 24 मे 2019 रोजी लागलेल्या भीषण आगीत 22 विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला होता. अपुरा सुरक्षा व्यवस्था आणि बाहेर पडण्यासाठी सुरक्षित मार्ग नसल्याने अनेक विद्यार्थ्यांना जीव गमवावा लागला होता.त्यानंतर 1 डिसेंबर 2025 रोजी पिंपळे सौदागर येथील कोचिंग क्लासमध्ये आग लागल्याची घटना घडली. सुदैवाने पिंपरी-चिंचवड अग्निशमन दलाने वेळीच धाव घेत 42 विद्यार्थ्यांची सुरक्षित सुटका केली. मात्र ही घटना भविष्यातील संभाव्य मोठ्या दुर्घटनेचा इशारा मानली जात आहे.

दरम्यान, 22 जून 2026 रोजी उत्तर प्रदेशातील लखनौ येथे कोचिंग/प्रशिक्षण संस्थेशी संबंधित इमारतीत लागलेल्या आगीत 15 जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली. या दुर्घटनेने गर्दीच्या शैक्षणिक संस्थांमधील सुरक्षा व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे.तज्ज्ञांच्या मते, अनेक कोचिंग क्लासेस अरुंद जागांमध्ये, अपुऱ्या जिन्यांसह किंवा आपत्कालीन निर्गमन मार्गांशिवाय चालविले जात आहेत. काही ठिकाणी अग्निशमन यंत्रणा केवळ कागदोपत्री असून प्रत्यक्षात ती कार्यरत नसल्याचेही दिसून येते.

यामुळे प्रशासनाने सर्व कोचिंग क्लासेस, प्रशिक्षण केंद्रे आणि खाजगी शैक्षणिक संस्थांची विशेष मोहीम राबवून सुरक्षा तपासणी करावी, फायर सेफ्टी प्रमाणपत्रांची पडताळणी करावी तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

"आग लागल्यानंतर मदत पोहोचविण्यापेक्षा आग लागू नये यासाठीची पूर्वतयारी अधिक महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेशी कोणतीही तडजोड परवडणारी नाही," असा इशाराही अग्निसुरक्षा तज्ज्ञांनी दिला आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 25/06/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय क्षेत्रात कलम 37 लागू; 7 जुलैपर्यंत जमावबंदी

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**प्रतिनिधी युनूस खतीब पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी : पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस सहआयुक्त सारंग आवाड यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 च्या कलम 37 (1) व (3) अंतर्गत आदेश जारी केला आहे.**

या आदेशानुसार 24 जून 2026 रोजी रात्री 12.01 वाजल्यापासून 7 जुलै 2026 रोजी मध्यरात्रीपर्यंत पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीत शस्त्रे, स्फोटके, दाहक पदार्थ, दगड, काठ्या, तलवारी आदी घातक वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे.तसेच कोणत्याही व्यक्तीचे प्रतीकात्मक प्रेत किंवा प्रतिमा जाळणे, मोठ्याने घोषणा देणे, आक्षेपार्ह भाषणे करणे, कायदा-सुव्यवस्थेला बाधा पोहोचेल असे साहित्य प्रसारित करणे यावरही बंदी घालण्यात आली आहे.

कलम 37 (3) नुसार पाचपेक्षा अधिक व्यक्तींचा जमाव करण्यास तसेच पोलीस आयुक्तांच्या पूर्वपरवानगीशिवाय सभा, मोर्चे किंवा मिरवणुका काढण्यास मनाई करण्यात आली आहे.मात्र शासन सेवेत असलेल्या व कर्तव्यपूर्तीसाठी शस्त्र बाळगण्याची अधिकृत परवानगी असलेल्या व्यक्तींना हा आदेश लागू राहणार नाही.या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 च्या कलम 135 अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# बँक खात्यातून परस्पर 10.74 लाख रुपये लंपास चाकणमधील तरुण सायबर फसवणुकीचा बळी

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड प्रतिनिधी | युनूस खतीब**

**चाकण परिसरातील एका तरुणाच्या बँक खात्यातून त्याच्या संमतीशिवाय 10 लाख 74 हजार 129 रुपये परस्पर काढून घेतल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी चाकण दक्षिण पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात सायबर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विकासकुमार पटलेस लोणी (वय 32, रा. मेदनकरवाडी, ता. खेड) यांचे ॲक्सिस बँकेच्या चाकण शाखेतील खात्यातून 16 ऑगस्ट 2025 ते 4 सप्टेंबर 2025 या कालावधीत त्यांच्या परवानगीशिवाय विविध व्यवहार करण्यात आले. या व्यवहारांमधून एकूण 10.74 लाख रुपयांची रक्कम वळती करण्यात आल्याचे समोर आले आहे.

खात्यातील रक्कम गायब झाल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादीने पोलिसांकडे धाव घेतली. तक्रारीनंतर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

सायबर गुन्हेगारांनी नेमकी कोणती पद्धत वापरून खाते हॅक केले किंवा व्यवहार केले याचा तपास सुरू असून आर्थिक गुन्हे शाखेचीही मदत घेतली जाण्याची शक्यता आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 25/06/2026

e Paper

पिंपरी चिंचवड | पुणे

# MIDC इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न अधिवेशनात ऐरणीवर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड - मुंबई/: पिंपरी-चिंचवडमधील संभाजीनगर आणि शाहूनगर येथील एमआयडीसीच्या (MIDC) हजारो जुन्या इमारतींच्या रखडलेल्या पुनर्विकासाचा आणि तिथल्या रहिवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न भाजप आमदार अमित गोरखे यांनी चालू विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात पुन्हा एकदा ऐरणीवर आणला. विधान परिषदेच्या सभागृहात लक्षवेधी सूचनेवर चर्चा करताना आमदार गोरखे यांनी कष्टकरी कामगारांच्या हक्कासाठी आवाज उठवला.**




आमदार अमित गोरखे यांनी सभागृहाचे लक्ष वेधताना सांगितले की, शहराच्या जडणघडणीत योगदान देणारा आपला मोठा कामगार वर्ग संभाजीनगर आणि शाहूनगर भागातील एमआयडीसीच्या इमारतींमध्ये राहतो. आज हे कामगार बांधव निवृत्त झाले असून ज्येष्ठ नागरिक झाले आहेत. 40-50 वर्षे जुन्या झालेल्या या इमारती आज अत्यंत जीर्ण अवस्थेत आहेत. सर्वात क्लेशदायक बाब म्हणजे, या इमारतींना लिफ्ट नसल्यामुळे आपल्या वृद्ध माता-भगिनींना आणि ज्येष्ठ नागरिकांना 6 व्या ते 7 व्या मजल्यावर पायी चढ-उतार करावी लागत आहे, जी त्यांच्या आरोग्याशी क्रूर थट्टा आहे.

या भागात 'युडीसीपीआर' (UDCPR) लागू नसल्यामुळे इमारतींचा पुनर्विकास पूर्णपणे रखडला आहे. मागील अधिवेशनात यावर विशेष बैठक घेण्याचे आश्वासन देऊनही अद्याप बैठक न झाल्याने रहिवाशांमध्ये तीव्र असंतोष आहे. यासंदर्भात तातडीने विशेष धोरण लागू करण्याची आग्रही मागणी देखील आमदार अमित गोरखे यांनी यावेळी केली.आमदार अमित गोरखे यांच्या या आक्रमक पवित्र्यानंतर उद्योगमंत्री श्री. उदयजी सामंत यांनी सभागृहात सकारात्मक प्रतिसाद दिला.

ज्या पद्धतीने 'MMIDR' (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण) क्षेत्रात धोरण राबवले जाते, त्याच धर्तीवर पिंपरी-चिंचवड परिसरातील या एमआयडीसी इमारतींसाठी देखील विशेष पुनर्विकास धोरण लागू करण्याबाबत एमआयडीसी नक्कीच सकारात्मक विचार करेल, असे त्यांनी दिले.

# शेकडो विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत 'समर्थ'च्या पोस्टरचे भव्य अनावरण

## समर्थ रामदासांच्या विचारांना आधुनिक मानवंदना

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड, 24 जून - समर्थ रामदास स्वामींची शिकवण, मनोपासना, बलोपासना आणि नव्या पिढीचा उत्स्फूर्त सहभाग अशा प्रेरणादायी वातावरणात आगामी 'समर्थ' या बहुप्रतीक्षित चित्रपटाच्या पोस्टरचे भव्य अनावरण पुण्यात पार पडले. पिंपरी-चिंचवडमधील निगडी प्राधिकरण येथील ज्ञानप्रबोधिनी प्रशालेत सुमारे अडीच हजार विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत हा सोहळा विशेष उत्साहात संपन्न झाला.**




समर्थ रामदासांनी दिलेल्या मनोपासना आणि बलोपासनेच्या शिकवणीचे प्रात्यक्षिक यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केले. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी सामूहिकरित्या सूर्यनमस्कार घालत समर्थांच्या विचारांना मानवंदना दिली. तर मनाचे श्लोकमधील 13 श्लोकांचे एकसुरात पठण करत परिसर भक्तिमय आणि ऊर्जावान वातावरणाने भारून गेला होता. या अनोख्या उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत 'समर्थ' चित्रपटाच्या पोस्टरचे अनावरण करण्यात आले. आजच्या पिढीला समर्थ रामदास स्वामींच्या विचारांशी जोडण्याचा हा एक आगळावेगळा प्रयत्न असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमास सज्जनगड येथील श्री समर्थ रामदास स्वामी संस्थानचे प्रमुख बाळासाहेब स्वामी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच कार्यक्रमाला आशीर्वाद देण्यासाठी आदरणीय चंद्रतनय दादा उपस्थित होते. त्यांनी आपल्या प्रेरणादायी उद्बोधनातून समर्थ रामदास स्वामींच्या विचारांचा आणि तत्त्वज्ञानाचा आधार घेत उपस्थितांना मार्गदर्शन केले व समर्थ विचारांचा संदेश दिला. याव्यतिरिक्त डॉ. राजीव नगरकर, रामकथाकार, प्रवचनकार तसेच चित्रपटाचे मूळ कथा आणि संकल्पनाकार रवींद्र पाठक, दिग्दर्शक योगेश फुलफगर, क्रिएटिव्ह प्रोड्युसर आणि कार्यकारी निर्माता अमोल भगत, तसेच कलाकार पुष्कराज चिरपुटकर, शर्वरी जमेनीस, हार्दिक जोशी आणि यतीन कार्येकर, ज्ञानप्रबोधिनीचे केंद्रप्रमुख मनोज देवळेकर, आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरही उपस्थित होते.

कथा आणि संकल्पनाकार रवींद्र पाठक, "समर्थ रामदास स्वामी हे केवळ इतिहासातील व्यक्तिमत्त्व नसून आजच्या काळासाठीही तेवढेच आवश्यक असे विचार आहेत. शिस्त, सामर्थ्य, राष्ट्रप्रेम आणि आत्मविश्वासाचा संदेश देणाऱ्या त्यांच्या शिकवणीची नव्या पिढीशी नव्या माध्यमातून ओळख करून देण्याचा प्रयत्न आम्ही 'समर्थ'मधून करत आहोत. शेकडो विद्यार्थ्यांच्या साक्षीने झालेले हे पोस्टर अनावरण आमच्यासाठी अत्यंत भावनिक आणि प्रेरणादायी क्षण आहे."

यावेळी दिग्दर्शक योगेश फुलफगर म्हणाले, "हा एक आधुनिक काळातील मनोरंजनप्रधान चित्रपट आहे. समर्थ रामदासांच्या विचारसरणीचा आजच्या काळातही युवक, नवपिढी आणि समाजातील प्रत्येक घटकाला कसा फायदा होऊ शकतो, हे या चित्रपटातून दाखवण्यात आले आहे. काळाच्या ओघात आपण त्यांच्या अनेक विचारांचा विसर पाडला आहे; मात्र त्या विचारांची कास धरली, तर त्यातून वैयक्तिक आणि सामाजिक पातळीवर कोणते सकारात्मक बदल घडू शकतात, याचं मनोरंजक चित्रण या चित्रपटात करण्यात आलं आहे.

हा समर्थ रामदासांचा बायोपिक नसून, त्यांच्या विचारांवर आधारित एक व्यावसायिक चित्रपट आहे."थर्मोलाइन मार्केटिंग प्रा. लि. प्रस्तुत आणि ए3 इव्हेंट्स अँड मीडिया सर्व्हिसेस निर्मित 'समर्थ' हा चित्रपट ऑगस्ट 2026 मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून, समर्थ रामदास स्वामींच्या विचारसंपदेचा आधुनिक संदर्भात घेतलेला हा प्रवास रसिकांसाठी प्रेरणादायी अनुभव ठरणार आहे.रवींद्र पाठक यांनी प्रास्ताविक व आभार प्रदर्शन केले. विनया देसाई यांनी सूत्रसंचालन केले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968